मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 09 जुलै 2026 | पान- 1

# मोशी कचरा डेपोत मोठी दुर्घटना!

## कचऱ्याचा ढीग प्रशासकीय इमारतीवर कोसळला; 15 जण अडकल्याची भीती



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पब्लिक-प्राइवेट पार्टनरशिप (पीपीपी) मॉडेलवर विकसित केल्या जाणाऱ्या 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाच्या ठिकाणी मोठी दुर्घटना घडली आहे. येथे एका निर्माणाधीन इमारतीचा मोठा भाग अचानक कोसळला. या अपघातात सुमारे १५ ते १६ मजूर ढिगाऱ्याखाली अडकल्याची प्राथमिक भीती व्यक्त केली जात असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. दुपारी जेवणाची वेळ असल्याने सर्व कर्मचारी कार्यालयाच्या इमरतीत होते अशी माहिती मिळत आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच स्थानिक अग्निशामक दल, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथके तत्काळ घटनास्थळी दाखल झाली आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि बचाव पथकाचे सदस्य घटनास्थळी उपस्थित असून ढिगारा उपसण्याचे काम सातत्याने सुरू आहे.

हा अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याचे अचूक कारण अद्याप समजू शकलेले नाही. प्राथमिक माहितीनुसार, बांधकाम सुरू असताना अचानक हा सांगाडा कोसळला. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढणे आणि त्यांना तातडीने उपचार मिळवून देणे ही आमची पहिली प्राथमिकता असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. जसजसे बचाव कार्य पुढे जाईल, तशी परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. या घटनेनंतर प्रकल्पाच्या ठिकाणी सुरक्षा मानकांबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### मोशीतील कचरा डेपोमधील घटना


» अतिवृष्टीमुळे मोशी कचरा डेपो येथील कचऱ्याचा डोंगर महापालिकेच्या 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळला. आठ ते दहा कर्मचारी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी मदतकार्य सुरू केले असून, अग्रशामक दल व आपत्ती व्यवस्थापनाचे जवान पोहोचले आहे. जखमी कर्मचाऱ्यांना रुग्णालयात हलवण्याचे काम सुरू असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

### मोशीतील कचरा डेपोची क्षमता संपुष्टात

» शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून ३० लाखांवर पोहोचली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच कचरा संकलनातही वाढ होत आहे. त्यामुळे शहरातील कचऱ्याची समस्याही मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागली आहे. मोशीतील कचरा डेपोची निर्मिती सन १९१ साली झाली आहे. मागील ३५ वर्षांपासून शहरातील कचरा येथील ८१ एकर जागेत जमा केला जातो. कचऱ्याचे डोंगर तयार झाले असून डेपोची क्षमता संपुष्टात आली आहे. सन २०१७ मध्ये शहरात प्रतिदिन ८३२ टन कचरा निर्माण होत होता. आता एक हजार ५७९ टन प्रतिदिन कचरा निर्माण होत आहे. नऊ वर्षात ७४७ टनांनी कचरा वाढला आहे.

# पवना धरणातील पाणीसाठा 70 टक्क्यांवर..

## शहरातील 15 टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करा; माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांची मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरणातील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन तो सुमारे ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला असतानाही पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठ्यावर लागू असलेली १५ टक्के कपात अद्याप कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांकडे पाणीपुरवठ्यावरील निर्बंध तात्काळ हटवून पूर्ववत पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आली आहे.

काही दिवसांपूर्वी पवना धरणातील पाणीसाठा केवळ १५ टक्क्यांवर आल्याने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन महानगरपालिकेने शहरातील पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात केली होती. तसेच पाणीपुरवठ्याच्या वेळेतही कपात करून पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी नागरिकांनी प्रशासनाच्या निर्णयाला सहकार्य करत पाणी बचतीसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला होता.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून धरण परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली असून तो आता ७० टक्क्यांच्या घरात पोहोचला आहे. त्यामुळे शहरावर ओढावलेली पाणीटंचाईची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी झाली असल्याचे चित्र आहे

असे असतानाही शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा, कमी कालावधीचा पुरवठा आणि अनियमित वितरण अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यावरील १५ टक्के कपात रद्द करून पूर्वीप्रमाणे नियमित वेळेनुसार आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने पवना धरणातील सध्याच्या पाणीस्थितीचा आढावा घेऊन शहरातील पाणीपुरवठ्यावरील निर्बंध तात्काळ हटवावेत आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

# पालखी सोहळ्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस सज्ज!

## तुकाराम आणि ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर लाखो वारकरी; सुरक्षा, वाहतूक आणि गर्दी नियंत्रणासाठी सर्वंकष नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सहा ते सात लाखांहून अधिक वारकरी आणि भाविक शहरातील पालखी मार्गावरून प्रवास करणार आहेत. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी दोन हजारांहून अधिक पोलिस अधिकारी-कर्मचारी तैनात असणार आहेत. याशिवाय एसआरपीएफ, होमगार्ड, बॉम्बशोधक पथक आणि वाहतूक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक संवेदनशील ठिकाणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सर्व यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या आहेत.

संत तुकाराम महाराज पालखी ७ जुलै रोजी देहूतून प्रस्थान करून ८ जुलै रोजी आकुर्डी येथे मुक्काम करणार आहे. त्यानंतर ९ जुलै रोजी पिंपरी, कासारवाडी आणि दापोडीमार्गे पुणे शहरात प्रवेश करणार आहे. तसेच, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी ८ जुलै रोजी आळंदीतून प्रस्थान करून गांधीवाडा येथे मुक्काम करणार आहे. ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ९ जुलै रोजी भोसरी, दिघीमार्गे पुणे शहराच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे. या दोन्ही पालखी सोहळ्यादरम्यान मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित राहणार असल्याने पोलिस प्रशासनाने सर्वंकष नियोजन केले आहे.

पोलिसांनी पालखी मार्गावरील गर्दीची ठिकाणे निश्चित करून तेथे अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याचे नियोजन केले आहे. देहू मंदिर परिसर, इनामदार वाडा, अनगडशहा बाबा, भक्ती-शक्ती चौक, आकुर्डी, पिंपरी, कासारवाडी, हॅरिस ब्रिज दापोडी, आळंदी, गांधीवाडा, भोसरी फाटा, दिघी आणि इतर ठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज असल्याने या ठिकाणी विशेष सुरक्षा व्यवस्था राहणार आहे.

यंदाच्या बंदोबस्तासाठी पोलिस आयुक्तालयातील सर्व यंत्रणा कार्यरत राहणार आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते पोलिस शिपायांपर्यंत सर्व मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. एसआरपीएफच्या तीन कंपन्या, होमगार्ड, बॉम्बशोधक व नाशक पथक (बीडीडीएस), वाहतूक शाखा, रॅपिड कंट्रोल पथक तसेच विविध प्रकारची वाहने बंदोबस्तात सहभागी असणार आहेत. एकूण आठ वरिष्ठ अधिकारी, १९ सहाय्यक पोलिस आयुक्त व पोलिस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी, ५२ पोलिस निरीक्षक, २३० उपनिरीक्षक व सहाय्यक अधिकारी, १ हजार ९९९ पोलिस कर्मचारी, ४३५ वाहतूक कर्मचारी, ८०० होमगार्ड, १२ ट्रक, २० जीप आणि इतर वाहने बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहेत.

पालखी मार्ग सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक व्यवस्थेवरही विशेष भर देण्यात आला आहे. संत तुकाराम महाराज पालखी मार्गासाठी ३२ रस्ते तात्पुरते बंद ठेवण्यात येणार असून, ४३ ठिकाणी वाहतुकीचे मार्ग बदलण्यात येणार आहेत. याशिवाय १८ महत्त्वाच्या चौकांवर वाहतूक पोलिसांचा विशेष बंदोबस्त राहणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गासाठी १३ रस्ते बंद राहणार असून, सात ठिकाणी वाहतुकीचे पर्यायी मार्ग लागू करण्यात येणार आहेत. नऊ महत्त्वाच्या चौकांवर वाहतूक नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.



### या ठिकाणी सर्वाधिक गर्दीचा अंदाज

**» पालखी सोहळ्यादरम्यान देहू मंदिर परिसर, इनामदार वाडा, अनगडशहा बाबा, भक्ती-शक्ती चौक, आकुर्डी येथील विठ्ठल मंदिर, पिंपरी एच. ए. कॉलनी, कासारवाडी, हॅरिस ब्रिज (दापोडी), आळंदी मंदिर परिसर, गांधीवाडा, भोसरी फाटा आणि दिघी गाव या ठिकाणी सर्वाधिक गर्दी होण्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. काही ठिकाणी तीन ते सहा लाखांपर्यंत भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने या सर्व ठिकाणी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी विशेष पथके तैनात करण्यात येणार आहेत.**

> **पालखी सोहळा निर्विघ्न, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पार पडावा, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने सर्वंकष नियोजन केले आहे. सुरक्षा, वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करण्यात आले असून भाविकांनी सहकार्य करावे.**
>
> **- विनय कुमार चौबे, पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड**

# पिंपळे सौदागरमधील बहुतांश भागांचा वीजपुरवठा पूर्ववत

## उर्वरित काही भागांमध्ये युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिंपळे सौदागर परिसरासह शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र, प्रशासन आणि महावितरणच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे पिंपळे सौदागरमधील बहुतांश भागांतील वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला असून उर्वरित काही भागांमध्ये युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली आहे

मिळालेल्या माहितीनुसार, व्हेंटेज सोसायटी, पीस व्हॅली सोसायटी, साई श्री सोसायटी आणि शिवराज नगर परिसरात तांत्रिक बिघाड तसेच पाणी साचल्यामुळे वीजपुरवठा अद्याप खंडित आहे. या भागांतील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने प्रयत्न करत आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला असून, वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले आहे. पावसाचा जोर आणि सुरक्षेच्या कारणास्तव दुरुस्तीच्या कामाला काहीसा वेळ लागत असला तरी वीजपुरवठा लवकरच सुरळीत होईल, असा विश्वास शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केला आहे

दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन देखील शत्रुघ्न काटे यांनी केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पिंपळे सौदागर परिसरासह शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. मात्र, प्रशासन आणि महावितरणच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे पिंपळे सौदागरमधील बहुतांश भागांतील वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला असून उर्वरित काही भागांमध्ये युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली आहे.





# महापालिका अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती

## राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ; आपत्ती व्यवस्थापनाचा घेतला आढावा



**पुणे | प्रतिनिधी**

लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला लोकांना उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळे पुढच्या काही वर्षांचा विचार करून हे प्रश्न सोडवावे लागतील. शिवाय पावसाचा ट्रेंड बदलला असून, गेल्या काही वर्षांत कमी वेळेत अधिक पाऊस होत आहे. त्यादृष्टीने काय तयारी केली, यासह अनेक प्रश्नांची सरबत्ती केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मंगळवारी महापालिका अधिकाऱ्यांवर केली.

आवश्यक त्या सर्व यंत्रणा पुरवण्यास आम्ही तयार आहोत; परंतु तुम्ही पुणेकरांना कोणतीही अडचण येणार नाही, असे काम करा, असेही मोहोळ म्हणाले.

मंत्री मोहोळ यांनी पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेत प्रशासनाची बैठक घेतली. या वेळी महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, गटनेते गणेश बिडकर, विरोधी पक्ष नेते निलेश निकम, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्यासह गटनेते, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून निधी उपलब्ध असताना गेल्या तीन वर्षांत शहरातील पाणी साठणाऱ्या ठिकाणांची संख्या किती कमी केली, असाही प्रश्न मोहोळ यांनी अधिकाऱ्यांना विचारला. पुणेकरांना समस्या निर्माण होईल, असे एकही ठिकाण शहरात नको. पाणी साचणाऱ्या १२० पैकी ८५ ठिकाणची कामे झाल्याचे प्रशासन सांगत आहे, तर त्या ८५ ठिकाणांपैकी किती ठिकाणी पाणी साचले नाही, असे मोहोळ यांनी विचारले.

सिंहगड रस्त्यावरील आपत्कालीन कक्ष सुरू करण्याचेही निर्देश मोहोळ यांनी अधिकाऱ्यांना दिले, तसेच नदीपात्रात फ्लड सेंसरची संख्या वाढवून स्थानिक पातळीवर नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, याबाबतही त्यांनी सूचना दिल्या.

कमी वेळेत जास्त पाऊस होत असल्याने शहरात खड्डे पडण्याची शक्यता असून, खड्ड्यांची माहिती प्राप्त झाल्यावर लगेचच खड्डे बुजविण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा. खड्ड्यांची माहिती कळविण्यासाठी व्हॉट्स ॲप नंबर उपलब्ध करून देण्याबाबतही मोहोळ यांनी सूचित केले.

### खड्डयांसाठी तातडीची यंत्रणा उभारण्याचे निर्देश

» सततच्या पावसामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिकेने तातडीची दुरुस्ती यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश मुरलीधर मोहोळ यांनी दिले. नागरिकांकडून खड्ड्यांच्या तक्रारी तत्काळ मिळाव्यात यासाठी स्वतंत्र व्हॉट्सअॅप क्रमांक सुरू करण्याची सूचनाही त्यांनी केली. तक्रार मिळाल्यानंतर त्वरित दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत ठेवण्यावर भर देण्यास सांगितले. पुणेकरांना पावसाळ्यात कमीत कमी त्रास होईल, यासाठी प्रशासनाने सक्रियपणे काम करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### बदलत्या पावसाच्या ट्रेंडनुसार नियोजन करा

» गेल्या काही वर्षांत कमी वेळेत अतिवृष्टी होण्याचे प्रमाण वाढल्याने शहराच्या पायाभूत सुविधांचे नियोजन बदलण्याची गरज असल्याचे मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट केले. पाणी साचणाऱ्या भागांचे कायमस्वरूपी निराकरण, नदीपात्रात अधिक फ्लड सेन्सर बसविणे, सिंहगड रस्त्यावर आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू करणे आणि नागरिकांना वेळेवर सूचना देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. भविष्यातील संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने वैज्ञानिक आणि दीर्घकालीन दृष्टीकोन स्वीकारावा, असेही त्यांनी सांगितले.

### अधिकाऱ्यांना मोहोळ यांचे खडे बोल

» केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पावसामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेत प्रशासनाला जाब विचारला. गेल्या तीन वर्षांत शहरातील पाणी साचणाऱ्या ठिकाणांची संख्या किती कमी झाली, याची माहिती मागवत त्यांनी ठोस कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली. केंद्र व राज्य शासनाकडून निधी उपलब्ध असतानाही नागरिकांना दरवर्षी त्याच समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. पुढील काही वर्षांचा विचार करून दीर्घकालीन नियोजन करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना दिले.

# पालखी आगमनामुळे वाहतुकीत बदल ;नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

## गुरुवारी शहर वाहतुकीत मोठे बदल, मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्ते टप्प्याटप्प्याने बंद




**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त गुरुवारी (९ जुलै) शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात येणार आहेत. पालखी सोहळ्याचे आगमन झाल्यानंतर शहराच्या मध्यवर्ती भागातील अनेक प्रमुख रस्ते टप्प्याटप्प्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात येतील. पालखी मार्गस्थ झाल्यानंतर संबंधित रस्ते पुन्हा वाहतुकीसाठी खुले करण्यात येणार आहेत. भवानी पेठेतील श्री निवडुंगा विठोबा (पालखी विठोबा) मंदिरात मुक्कामी दाखल होणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी वाहतूक पोलिसांनी सुचविलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बंद असलेले रस्ते ( कंसात पर्यायी रस्ता)

पहाटे ३ ते रात्री ८ पर्यंत

– बोपखेल फाटा ते विश्रांतवाडी (धानोरी रस्ता, अंतर्गत रस्ते)

– प्रादेशिक मनोरुग्णालय ते आळंदी रस्ता चौक (येरवडा कारागृह रस्ता, विमानतळ रस्ता)

– सादलबाबा चौक ते पाटील इस्टेट (पर्णकुटी चौक, मंगलदास चौक, आरटीओ चौक)

-बोपोडी चौक ते चर्च चौक (बोपोडीतील भाऊ पाटील रस्ता, ब्रेमेन चौक, औंध रस्ता)

– पोल्ट्री फार्म चौक, औंध, बालेवाडी मार्ग (रेल्वे पोलीस मुख्यालय, ब्रेमेन चौक)

– पिंपरी-चिंचवडमार्गे शहरात येणारी वाहतूक (भाऊ पाटील रस्ता, ब्रेमेन चौक)

सकाळी ८ ते रात्री ११

– रेंजहिल चौक ते संचेती चौक ( रेंजहिल, सेनापती बापट रस्ता, नळस्टॉप चौक)

– खंडोजीबाबा चौक ते वीर चापेकर चौक (कर्वे रस्ता, सेनापती बापट रस्ता, रेंजहिल)

– गाडगीळ पुतळा ते स. गो. बर्वे चौक (कुंभारवेस चौक, आरटीओ चौक)

दुपारी १२ ते रात्री ११

– फर्ग्युसन रस्ता ते टिळक रस्ता

– डेक्कन ते कोथरूड, वारजे, सिंहगड रस्ता

– लक्ष्मी रस्ता ते बेलबाग चौक ते टिळक चौक

– शनिपार चौक ते सेवासदन चौक

– छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, गाडगीळ पुतळा चौक

-जिजामाता चौक ते बुधवार चौक

– नेहरू चौक ते सोन्यामारुती चौक

दुपारी २ ते रात्री १२

– लक्ष्मी रस्ता, बेलबाग चौक ते सेवासदन चौक

– छत्रपती शिवाजी महाराज रस्ता ते जिजामाता चौक, बुधवार चौक ते बेलबाग चौक

– लक्ष्मी रस्ता ते बेलबाग चौक

– देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक

– सोमवार पेठ पोलीस चौकी ते डुल्या मारुती चौक

– रामोशी गेट ते पालखी विठोबा मंदिर, संत कबीर चौक ते चाचा हलवाई चौक

# पावसाचा जोर ओसरला, विश्रांतीची शक्यता

## जलमय झालेल्या रस्त्यांवरून पाण्याचा निचरा झाल्याने नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहर आणि उपनगरांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचा जोर आज दुपारनंतर कमी झाला. सततच्या संततधारेमुळे जलमय झालेल्या रस्त्यांवरून पाण्याचा निचरा झाल्याने नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुढील २४ तासात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवत हवामान विभागाकडून यलो अलर्ट दिला आहे.

मागील आठवडाभरापासून पुणे शहरासह जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला होता. मात्र, आता पाऊस काहीशी विश्रांती घेण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. पुढील काही दिवस पुणेकरांना संततधारेपासून सुटका मिळेल.

मंगळवारी (दि. ७) दिवसभरात शिवाजीनगर परिसरात सर्वाधिक २५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. लोहगाव परिसरात १५ मिमी आणि एनडीए येथे १६ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत आज पावसाचा वेग आणि तीव्रता दोन्ही कमी होते. धरण क्षेत्रातील आवक आणि नद्यांची पाणी पातळी सध्यातरी नियंत्रणात असून, रात्री उशीरापर्यंत शहरात पावसाच्या अधून-मधून हलक्या सरी पडत होत्या.

खडकवासला धरणसाखळीच्या पाणलोट क्षेत्रात सोमवारी रात्री जोरदार पाऊस पडला. सर्वाधिक पाऊस पानशेत धरणाच्या परिसरात २५८ मिमी एवढा झाला. वरसगावला २४० मिमी, टेमघरमध्ये १९९ मिमी आणि खडकवासला येथे १०० मिमी पाऊस झाला. पडल्याची नोंद झाली आहे. खडकवासला धरण ९० टक्के भरले असून धरणातून कालव्यामध्ये ५०० क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. मंगळवारी सकाळी सहा ते सायंकाळी पाच वेळेत खडकवासला धरणात ३०, पानशेतला ६२, वरसगावला ६२ व टेमघरला ६० मिलिमीटर पाऊस झाला.



### धरणक्षेत्रात जोरदार पाऊस, खडकवासला ९०% भरले

» खडकवासला धरणसाखळीच्या पाणलोट क्षेत्रात सोमवारी रात्री जोरदार पाऊस झाला. पानशेत येथे २५८ मिमी, वरसगाव २४० मिमी, टेमघर १९९ मिमी आणि खडकवासला येथे १०० मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे खडकवासला धरण ९० टक्के भरले असून कालव्यातून ५०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत आहे. मंगळवारीही धरण परिसरात मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू होता. प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून धरणातील पाणीसाठ्यावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

### पावसाचा जोर ओसरला

» पुणे शहर आणि उपनगरांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा जोर मंगळवारी दुपारनंतर कमी झाला. रस्त्यांवरील पाण्याचा निचरा झाल्याने वाहतूक पूर्ववत होऊ लागली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने पुढील २४ तासांसाठी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करत यलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाची तीव्रता कमी झाली असली तरी सखल भागांमध्ये खबरदारी घेण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

### धरणातील पाणीस्थिती

» धरण – पाणीसाठा(टीएमसी) – टक्के
» खडकवासला – १.७५ – ८८.५२
» पनशेत – ४.५६ – ४२.८७
» वरसगाव – ५.०३ -३९.२५
» टेमघर- ०.८६ – २३.३

# पालखी सोहळ्यात प्रथमच एआय चा वापर

## बंदोबस्तासाठी सात हजार पोलीस, फेस रेक्गनिजेशन कॅमेरे वापरणार-पोलीस आयुक्त

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम पालखी सोहळ्याचे गुरुवारी (९ जुलै) शहरात आगमन होणार आहे. पालखी सोहळ्यात सात हजार पोलीस कर्मचारी बंदोबस्तास तैनात राहणार असून यंदा पालखी मार्गावर कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित (एआय) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, तसेच फेस रेक्गनिजेशन कॅमेरे, ॲडव्हान्स व्हिडीओ ॲनलटिक्स कॅमेऱ्यांचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, अतिरिक्त आयुक्त राजेश बनसोडे, संजय पाटील, तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आखणी केली आहे. यावेळी अमितेशकुमार म्हणाले, पालखी मार्ग, मुक्कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून त्यांची पालखी सोहळ्यावर नजर असेल. पालखी सोहळा सुरक्षित पार पडावा, याद्दष्टीने बंदोबस्ताची आखणी केली आहे. सोहळ्यातील प्रत्येक घडामोडींवर कॅमेऱ्यांची नजर असेल. आयुक्तालयातील नियंत्रण कक्षाशी हे कॅमेरे जोडले आहेत. त्याच्या मदतीने वाहतूक, गर्दीचे व्यवस्थापन होईल.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आगमन गुरुवारी बोपखेल येथे होईल. विश्रांतवाडीमार्गे पालखी, शिवाजीनगर, गणेशखिंड रस्ता, नामदार गोपाळकृष्ण गोखले पथ, लक्ष्मी रस्तामार्गे श्री भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर येथे मुक्कामी जाईल. श्री संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा जुना मुंबई-पुणे रस्तामार्गे शहरात येईल.

नाना पेठेतील श्री निवडुंग्या विठोबा मंदिरात पालखी मुक्कामी जाईल.



### पोलीस मदत केंद्र

» नाना पेठ पोलीस चौकी
» पालखी विठोबा मंदिर
» निवडुंग्या विठोबा मंदिर
» रामोशी गेट चौक, भवानी पेठ
» संत कबी चौक, नाना पेठ

यावेळी होणारी भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन दागिने हिसकावणे, मोबाइल संच हिसकावण्याच्या घटना रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस कर्मचारी गस्त घालणार आहेत.

चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून मार्गावरील प्रमुख चौकात बंदोबस्त असेल. मुक्कामी दर्शनासाठी महिला, पुरुषांसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था (रांग) आहे. बॉम्ब शोधक नाशक पथक (बीडीडीएस), शीघ्र कृती दलाची पथके (क्युआरटी) तैनात करण्यात येणार आहे.

पालखी सोहळ्याच्या माहिती देण्यासाठी यंदाही लाईव्ह लोकेशनलिक पोलिसांकडून समाज माध्यमात दिली जाईल, पालखी मार्ग, तसेच मुक्कामी पोलीस मदत केंद्र सुरू करण्यात येणार आहे. पालखी सोहळ्याचे आगमन, प्रस्थान सोहळा सुरळीत पार पडावा, याद्दष्टीने पालखी सोहळ्याचे प्रमुख, विश्वस्त, दिंडी प्रमुखांशी संवाद साधण्यात आला असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.